लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा पुन्हा सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तौक्ते चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीमुळे शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील गेल्या दोन दिवसांतील परीक्षा स्थगित केल्या होत्या. या परीक्षा आज, बुधवारपासून पूर्ववत सुरू झाल्या. बी. ए. सत्र तीन आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे ५० पेपर झाले.

या अभ्यासक्रमांच्या पेपरसाठी एकूण ५००८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी ३६७९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्वरूपात परीक्षा दिली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बुधवारी एकूण १७ परीक्षांचे निकाल जाहीर केले. त्यामध्ये एलएल. बी. (पाच वर्षे) सत्र एक ते दहा, एलएल. बी. (तीन वर्षे) सत्र एक ते पाच, एम. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) सत्र तीन, एम. एस्सी. एन्व्हायरन्मेंटल बायोटेक्नॉलॉजी सत्र तीन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. आतापर्यंत एकूण १८५ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

सकाळ

# समाजाला न्याय देणारे संशोधन असावे : डॉ. पाटील


डॉ.कृष्णा पाटील



टेंबलाईवाडी, ता. १९ : आपले संशोधन हे आपल्या देशाला, समाजाला व आपल्या विषयाला न्याय देणारे असावे. संशोधनाची समस्या निवडताना आवश्यक घटकांचा विचार करावा. संशोधन समस्येची निवड, संशोधनाचा पाया असतो. त्यामुळे त्याचा सर्व दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे, असे डॉ. कृष्णा पाटील यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्यावतीने संशोधन पद्धती या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, "संशोधन प्रस्ताव तयार करण्याचे निकष संशोधकाने अभ्यासणे गरजेचे आहे. या निकषाचा आधार घेऊन संशोधकाने अगोदर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला पाहिजे. जेणेकरून आपल्या संशोधनाला योग्य दिशा मिळेल. संशोधनाची उद्दिष्टे तयार करताना संशोधन समस्येचा शास्त्रीय अभ्यास करून त्याची मांडणी करणे गरजेचे आहे. या संशोधनाची गुणवत्ता सिद्ध होण्यासाठी आपला संशोधन प्रस्ताव हा योग्य नियोजनबद्ध होणे गरजेचे आहे. आपल्या संपूर्ण संशोधनाची गुणवत्ता, संशोधनाचा दर्जा, त्याची उपयुक्तता आपल्या संशोधन प्रस्तावाच्या गुणवत्तेवर आधारित आहे, ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक संशोधक विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रस्ताव तयार करावेत. आपले संशोधन राष्ट्राच्या व समाजाच्या विकासासाठी उपयुक्त ठरले पाहिजे." देशभरातून विद्यार्थी या व्याख्यानमालेत सहभागी झाले होते.

यावेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. आभार महेश चव्हाण यांनी मानले.